शेती कराराचा नमूना – केळी

---

हा शेती करार ( करार) यांनी आणि यांच्यामध्ये ------------------------------ त्यांचे कार्यालय -------------------------------- येथे असून ( यापुढे यांस कंपनी म्हणून संबोधण्यांत येईल)

आणि

शेतक-याचे नांव

पत्ता

( यापुढे यांस 'शेतकरी' म्हणून संबोधण्यांत येईल)

( यापुढे प्रत्येक शेतकरी आणि कंपनी यांना व्यक्तिगत 'पक्ष' म्हणून संबोधण्यांत येईल)

## उद्येशिका

ज्याअर्थी, कंपनी आपले लक्ष शेतक-यां सोबत जागतीक दर्जाची फळे भारतामध्ये/ भारतातून उत्पादित करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख आणि उत्पादनाचे तंत्र यावर करण्याकडे केंद्रित करीत आहे.

ज्याअर्थी, शेतकरी श्री / श्रीमती/कुमारी ---------------------------------- -----------मुलगा/मुलगी/पत्नी -------------------------------------

------ राहणार --------- तालुका---------------------- जिल्हा------- -----------------राज्य---------- (भारत) हे धारणजमीन शेती सर्व्हे क्रमांक ----------------- गाव ---------तालुका------------------ जिल्हा----------------राज्य------------ (भारत) जमिनीचे क्षेत्र ------- एकर, उपरोक्त क्षेत्रात केळाची लागवड करण्यांस उत्सुक आहे आणि कंपनीने त्यांना/तीला दर्जेदार केळ या फळाचे उत्पादन घेण्याकरिता तसेच त्यांच्या फळांचे उत्पादनाची खरेदी विक्री याकरिता मार्गदर्शन करावे अशी इच्छा प्रदर्शीत करीत आहे.

आता, म्हणून, दोन्ही पक्ष खालीलप्रमाणे करार करीत आहेत.

1. **व्याख्या** -

1.1. करार म्हणजे, केवळ केळीचे उत्पादन आणि खरेदि, करण्याकरिता करार.

1.2. 'केळी' म्हणजे केवंदिश प्रकारची केळी, ग्रँड नेन (जी-९) किंवा कंपनीला या शेतीकरिता योग्य वाटेल ती कोणत्याही प्रकारची केळी, आणि कंपनी त्याबाबत कराराच्या काळात शेतक-याला वेळोवेळी लिखीत स्वरुपात कळवेल.

1.3. दोन्ही 'पक्ष' म्हणजे, शेतकरी आणि कंपनी आणि एक 'पक्ष' म्हणजे शेतकरी किंवा कंपनी यापैकी एक.

1.4. 'उत्पादन' म्हणजे, कापनी करिता तयार असलेली केळीची फळे किंवा करारामध्ये विहीत केलेल्या जमिनीवरुन कापणी केलेली केळीची फळे.

1.5. 'पोचवणी करण्याचे ठिकाण' हे जमिनीशी संबंधीत असून, म्हणजे असे ठिकाण ज्याठिकाणी शेतक-याने केळीची कापनी केलेली आहे.

1.6. ‘प्रकल्प’ म्हणजे, शेतक-याने तयार केलेला व ज्या करांरातर्गत शेतीवरील प्रकल्प आणि कंपनीने सद्याच्या करारामध्ये खरेदी तसेच उत्पादन करण्यासाठी दिलेले प्रतिज्ञापत्र/वचन.

1.7. ‘जास्तीत जास्त अवशेषांची मर्यादा’ म्हणजे, भारतीय अन्न सुरक्षा आणि माणके अधिनियमामध्ये विहीत करण्यांत आलेला आणि चाचणींच्या वेळी केळांमध्ये आढळलेला किंवा निर्यातीच्या संदर्भात, ज्या प्रादेशिक क्षेत्रात केळांची विक्री् करावयाची आहे त्या क्षेत्रामध्ये ठरविलेल्या माणकापेक्षा रासायनीक अवशेषांचा स्तर जास्त नसावा.

1.8. ‘कापणीचे आदेश’ म्हणजे, कंपनीने लेखी स्वरुपात विहीत केलेले –

अ. कापणी / केळांची कटाई करिता निश्चीत केलेला दिनांक आणि वेळ.

ब. श्रेणी आणि केळाचे वय.

1.9. ‘फेटाळणे’, केळांचे बाबत, अशी केळी जी कंपनीने निर्धारीत केलेली आणि सोबतच्या परिशिष्ट ‘ड’ मध्ये निश्चीत केलेली गुणवत्ता प्रमाण प्राप्त करीत नाहीत किंवा अनुत्तीर्ण ठरत आहेत.

1.10. ‘रोखून ठेवण्याचे आदेश’ केळांचे बाबत, कंपनीने शेतक-यास दिलेल्या दिलेल्या लेखी सूचनांप्रमाणे कोणत्याही वेळी केळीची कापणी तात्काळ थांबविणे, ज्याची कंपनीकडे पोचवणी करावयाची आहे (यापूर्वी जारी केलेल्या कापणी आदेशा नंतर) किंवा कंपनीने कापणी पर्यंतच्या काळात केव्हाही जारी केलेला, शेतक-याने न पाळलेला विहीत व माहिती असलेला

/ कंपनीच्या सूचना सोबतच्या परिशिष्ट 'क' मध्ये निश्चीत करण्यांत आलेला लाल पट्टी आकारणी.

1.11. 'गुंडाळणे', 'विसर्जन', 'नादारी' किंवा 'पुनर्रचना', असा अन्वयार्थ लावलेला, ज्यामुळे समांतर किंवा सदृश कार्यवृत्त कार्यक्षेत्राच्या कायद्यांतर्गत अशा कंपनी किंवा महामंडळे आपला व्यवसाय करीत आहेत ज्यामध्ये दिवाळे, गुंडाळणे, पुनर्रचना, विसर्जन, व्यवस्था, संरक्षण किंवा ऋणकोंचे सहायय निर्धारीत आहे.

2. **कराराचा कालवाधी** –

2.1. सदरचा करार हा दिनांक------------------ पासून अंमलात येईल.

2.2. एका पिकाच्या कालावधीसाठी एकत्र काम करण्याचे दोन्ही पक्षांनी मान्य केलेले आहे ज्यामध्ये प्रक्रिया, स्थानिक व्यापारीक्षेत्रात विक्री किंवा आंतरराष्ट्रीय निर्यात अंतर्भुत आहे. शेतक-याने याची दक्षता घ्यावी की, तो/ती ने केळांची लागवड आणि उत्पादन याकरिता स्वतःला वाहून घेणे आवश्यक आहे आणि कराराच्या कालावधीमध्ये कंपनी सोबत सलगरित्या काम करणे जारी ठेवावे.

2.3. दोन्ही पक्षांनी हे मान्य केले पाहीजे की, ते दोघेही कराराच्या तारखेपासून पहील्या हंगामात एकत्रीत काम करतील. या अनुभवाच्या आधारे, पुढील वर्षाकरिता हा करार पुढे सुरु ठेवावा अथवा नाही याबाबत दोन्ही पक्षांनी आपसात निश्चत करावे.

2.4. असा करार दोन्ही पक्ष पुढील एक पीक हंगामाकरिता आपसी सहमतीने वाढवू शकतील.

3. **शेती उत्पादनाचे वर्णन** –

3.1. सदरचा करार हा केवळ केळीच्या केवंदिश प्रकारची केळी, ग्रँड नेन (जी-९) किंवा कंपनीला शेतीकरिता त्यांच्या विवेकबुध्दीला योग्य वाटेल अशा कोणत्याही प्रकारासाठी राहील.

4. **गुणवत्तेचे विनिर्देश** –

4.1. जी केळी परिशिष्ट 'ड' मध्ये विहीत केलेले गुणवत्तेचे विनिर्देश पूर्ण करीत आहेत ती स्वीकाराहर्य राहतील. तुटलेली, हानी पोहोचलेली, अती परिपक्व झालेली आणि फळाच्या सालाचा रंग योग्य नसलेली फळे स्वीकाराहर्य असणार नाहीत.

4.2. सुर्याच्या उष्णतेने जळलेली केळी स्वीकाराहर्य असणार नाहीत.

4.3. सर्व उत्पादने जी परिशिष्ट 'ड' मधील नमूद अभिलक्षण पूर्ण करीत नसतील ते स्वीकाराहर्य असणार नाहीत.

5. **कार्य आणि जबाबदा-या** -

5.1. उद्येशिकेमध्ये नमूद केलेल्या जमिनीवर केळाचे पीक घेणे आणि त्याची कापणी करणे याविषयी परिशिष्ट 'ड' मध्ये नमूद केलेले विनिर्देशास शेतक-याने सहमती दर्शविली आहे. केळाची मेदयुक्त संस्कृती असलेली

झाडे पेरणीकरिता, कंपनीच्या हस्तक्षेपाशिवाय, विकत घेणे ही संपूर्ण जबाबदारी शेतक-यांची आहे.

5.2. कंपनीने किंवा त्यांच्या तांत्रीक सेवा पुरविणा-या संस्थेने विहीत केलेले तंत्रज्ञान आणि उत्पादन पध्दती ज्यामध्ये कंपनीने प्राधिकृत केलेले साहित्य, रसायन आणि सुरक्षे करिता दिलेली युक्ती याच्या वापराबाबत दिलेले निर्देश याचा अवलंब करावा व त्यास चिकटून राहणे आवश्यक आहे. कंपनीने विनिर्देश आणि कार्याबाबत शेतक-यास लिखीत स्वरुपात कळवावे. असे विनिर्देश प्रकल्प काळात बदलल्या जावू शकतात.

5.3. शेतक-याने, त्याने /तीने स्वतःच्या जोखीमेवर, प्रकल्पाचा विकास, कापणीपूर्व व कापणीची कामे ज्यामध्ये जमिनीचा विकास, पायाभूत सुविधांचा विकास, रोपवनाकरिता दर्जेदार साधणांची उपलब्धता, रोपांची निगा राखण्याकरिता सुविधा, फळांची निगा राखण्याच्या सुविधा, पोषण आणि रासायनीक खतांची व्यवस्था, तुषार सिंचनांची मांडणी आणि व्यवस्थापन, सिंचनाकरिता पाण्याची व्यवस्था, निंदणीचे नियंत्रण आणि व्यवस्थापन, स्वच्छता, रोग आणि कीट नियंत्रण व्यवस्थापन, कापणी किंवा इतर कोणतीही प्रक्रिया उत्तम उत्पादनाकरिता जेव्हा जे आवश्यक असेल ते पूर्ण करणे आवश्यक आहे.

5.4. शेतकरी, कामगार आणि आवश्यक असलेल्या साधणांची व्यवस्था चांगल्या निवडी करिता स्वतःच्या खर्चाने कंपनीच्या प्रतिनिधीच्या देखरेखीखाली तो /ती करेल,

5.5. तथापि, कंपनी आपल्या खर्चाने फळांची काळजी घेण्यासाठी पुढील बाबींसाठी उदा. अंकूराला इंजेक्शन, गुच्छ/ घडास फवारा, कामगारांची व्यवस्था करेल, डिफलॉवरींग – फुलांची तोड रोखणे, फळे काढण्यास अडथळा, चुकीच्या हाताने निरसण करणे, फळांची योग्य निगा राखण्यासाठी (जसे कामगारांची मजूरी, फळांची योग्य निगा राखण्यासाठीचा खर्च उदा. अंकुरास इंजेक्शन देण्याकरिता रसायन, गुच्छ / फडाला द्यावयाचा फवारा, गुच्छ/फड तोडण्यासाठी बॅग, रिबन, आणि स्प्रे पंप्स इत्यादि) वैयक्तीक स्तरावर अथवा कोणत्याही एजन्सी मार्फत कामगारांच्या नियुक्त्या करुन केळीच्या वनात रिबन बांधणे आणि गुच्छ/फड याची बांधणी करेल. परंतु शेतकरी सुध्दा आवश्यक मजूरांची वेळीच व्यवस्था करण्यासाठी जबाबदार राहतील आणि वेळीच फळांची निगा राखण्याचे अनुपालन करतील. फळांची निगा राखण्यासाठी लागणा-या मजूरांचे मजूरीवरील खर्च कंपनी पुरवेल किंवा शासनामार्फत त्याकरिता आर्थिक सहायय केल्या जाईल किंवा त्यासाठी आगावू रक्कम कंपनी देईल किंवा करारातील तरतुदीनुसार शेतकरी स्वतः खर्च करेल.

5.6. सरळ सुर्यप्रकाशा पासून वाचविण्यासाठी गुच्छांना/घडास वर्तमानपत्रामध्ये गुंडाळणे हे काम शेतकरी आपल्या खर्चाने करेल,

5.7. केळाच्या गुच्छास / घडास काही नुकसान होवू नये म्हणून त्याची वेळीच काळजी घेवून त्यास टेकू देवून त्याआधारे घडाचे नुकसान टाळण्याची जबाबदारी तो/ती शेतक-याची राहील.

5.8. तो/ती शेतकरी, आपल्या स्वतःच्या खर्चाने पीक विमा काढेल.

5.9. तो/ती शेतकरी, आपल्या स्वतःच्या खर्चाने माती, केळीची पाने आणि पाण्याचे परिक्षण करुन घेईल.

5.10. आवश्यकता असल्यास, जागतीक कृषी उत्पादन प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी लागणा-या सर्व कामांचे नियोजन शेतकरी करेल.

5.11. केळांमध्ये विहीत प्रमाणात अवशेष राहण्यासाठी आवश्यकता असल्यास, कंपनीच्या प्रतिनिधीच्या देखरेखीखाली शेतकरी आवश्यक ती सर्व काळजी घेईल.

5.12. उत्पादन आल्यानंतर, केळीच्या गुणवत्तेचे मानक निश्चीत करण्यासाठी स्वतःच्या खर्चाने निरीक्षण/ तपासणी करु शकेल.

5.13. जर याबाबत सहमती असेल तर,कंपनीने आपल्या स्वतःच्या जोखीमेवर व स्वखर्चाने कापणी नंतरची कार्ये, खालील कार्ये परंतु त्यांच्या मर्यादेत न राहता करावयाची आहेत.

5.13.1. शेती स्तरावर पृथक्करण/ प्रतवारी / बांधणी,

5.13.2. मध्यवर्ती वितरण केंद्रापर्यंत उत्पादनाची वाहतुक,

5.13.3. शितगृहात ठेवण्यापूर्वी आणि त्यानंतरची सर्व कार्यवाही,

5.13.4. आवेष्टन गृहातील सर्व कार्ये.

5.13.5. निर्यात आणि देशांतर्गत विक्री.

5.14. दर्जेदार उत्पादनासाठी शेतक-यास मार्गदर्शन करण्यास कंपनीने तंत्रज्ञांची व्यवस्था करुन द्यावी.

5.15. संबंधीत राज्य सरकारच्या फलोत्पादन विभागाशी कंपनीने शेतक-यास प्रकल्पातील निरनिराळया कार्यास शासनाच्या धोरणानुसार किंवा

मापदंडानुसार वेळोवेळी आर्थिक सहायय मिळण्यासाठी समन्वय ठेवावा. शेतक-याने सुध्दा आर्थिक मदत मिळण्यासाठी आवश्यक असेलेली सर्व दस्तऐवज वेळीच उपलब्ध करुन द्यावीत.

5.16. राज्य/केंद्र शासनाच्या सहकार्याने किंवा कंपनीच्या खर्चाने प्रशिक्षण, प्रकाशात आणण्यासाठी भेटी आणि प्रदर्शनाचे आयोजन कंपनीने करावे.

5.17. या करारनाम्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, कंपनीस मालाची पोचवणी झाल्यानंतर कोणत्याही नुकसानीस किंवा तोटयास शेतकरी जबाबदार राहणार नाही आणि किंमत तसेच कापणी नंतरच्या कोणत्याही विक्री आणि रसद अशा सर्व बाबींना, कंपनी सर्वस्वी जबाबदार राहील.

5.18. उत्पादन स्थळ, मत्ता आणि कोणत्याही कायदेशीर बाबी उदभवल्यास आणि त्यामुळे केळीच्या उत्पादनांचे काहीही नुकसान किंवा तोटा आल्यास त्यास कंपनीच सर्वस्वी जबाबदार राहील.

6. **पिकाची पोचवणी** –

6.1. कंपनी आणि शेतकरी यांच्या आपसी सहमतीने निश्चीत करण्यांत आल्याप्रमाणे पिकांची कापणी करावी. पीकाची कापणी कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधीं समोर करण्यांत येईल. तो/ती शेतकरी स्वतः किंवा कोणत्याही पक्षाच्याद्वारे उत्पादनाचा कोणताही भाग जो याअंतर्गत असलेल्या कंपनीस किंवा कोणत्याही त्रयस्थ पक्षास उत्पादन / फळांची पोचवणी करेल. कंपनीच्या सहमतीशिवाय किंवा उपस्थितीशिवाय शेतक-याने केलेली

कापणी हे कृत्य कराराचा भंग समजल्या जाईल आणि त्यामुळे कराराचा भंग केला म्हणून कंपनी योग्य ते पाऊल उचलेल.

6.2. तो/ती, शेतकरी त्याच्या /तीच्या शेतातील केळांची कापणी/ तोडणी करिता मजूरांची व्यवस्था करेल.

6.3. केळीची / केळीच्या घडाची –गुच्छांची मालवाहतुक ठरविलेल्या रुपये ------------- प्रती किलो (प्रकार अ + ब + क चा आकार) या चालु दराने करण्यासाठी कंपनी मजूरांची व्यवस्था करेल. केळीची मालवाहतुक करण्यासाठीचा खर्च चालु दराप्रमाणे कंपनी करेल किंवा करारनाम्यात ठरलेल्या शर्तीप्रमाणे शेतकरी करेल.

6.4. जर, मालवाहतुक करणारे वाहन वेळीच शेतात पोहाचले नाही तर, शेतकरी आपली केळी, बांधाबांध करण्याच्या / प्रक्रिया करण्याच्या स्थळी, पोहोचविण्याची कार्यवाही करेल आणि याकरिता लागणारा सर्व खर्च कंपनी करेल.

6.5. शेतकरी आपल्या शेतामध्ये केळीच्या प्रकियेकरिता वेळीच आणि पुरेशा पाण्याची व्यवस्था करेल आणि याकरिता लागणारा सर्व खर्च कंपनी करेल.

6.6. उत्पादनाच्या कापणीनंतर कंपनी उत्पादनाचे प्रकार अ, ब, क असे शेतातच सोबतच्या परिशिष्ट ‘ड’ मध्ये विनिर्दीष्ट आराखडयाप्रमाणे निश्चीत करेल. प्रकार आणि पृथक्करण करण्यासाठी येणारा मजूरीचा खर्च कंपनी करेल.

6.7. करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे उत्पादनाची गुणवत्ता आणि बांधाबांध याबाबतचा निर्णय तिस-या पक्षाच्या निरीक्षण/तपासणीच्या अधीन राहून घेण्यांत येईल.

6.8. प्रकल्प कालावधीत, परिशिष्ट 'ड' मध्ये विषद केलेले गुणवत्तेचे कमितकमी निकष पूर्ण करत असलेली केळी, शेती करारनाम्याप्रमाणे शेतक-यांकडून खरेदि करण्यांस, कंपनीस बंधनकारक राहील.

6.9. कंपनीने प्रत्येक आठवडयाचे तोडणीची अनुसूची तयार करुन शेतक-यास पोहोचती करणे आवश्यक राहील ज्यामुळे शेतकरी अशी केळी शेतीतून कापणीस व वाहतुक करण्यांस कंपनीच्या वाहनास परवानगी देईल.

7. **किंमतीचे निर्धारण** -

7.1. **विकल्प**-1 : परिशिष्ट 'ड' मध्ये विषद केलेले गुणवत्तेचे कमितकमी निकष पूर्ण करत असलेली केळी, कमित कमी हमी किंमतीवर शेतक-यांकडून कंपनी खरेदि करेल.

**विकल्प**-2 : परिशिष्ट 'ड' मध्ये विषद केलेले गुणवत्तेचे कमितकमी निकष पूर्ण करत असलेली केळी, कंपनी आपसी सहमतीने ठरलेल्या किंमतीवर खरेदि करेल. जी किंमत कमित कमी हमी किंमती पेक्षा कमी नसेल.

**विकल्प**-3 : परिशिष्ट 'ड' मध्ये विषद केलेले गुणवत्तेचे कमितकमी निकष पूर्ण करत असलेली केळी, कंपनी, कापणीच्या वेळी निश्चीत केल्याप्रमाणे मार्केट मधील चालु किंमतीनुसार, जी किंमत कमित कमी हमी किंमती पेक्षा कमी नसेल, त्या किंमतीवर खरेदि करेल.

**विकल्प**-4 **:** परिशिष्ट 'ड' मध्ये विषद केलेले गुणवत्तेचे कमितकमी निकष पूर्ण करत असलेली केळांच्या उत्पादनाचे किंमतीची परिगणना आपसी ठरल्याप्रमाणे, आणि मार्केट मधील किंमतीच्या चढ उतारामध्ये, जी जास्त असेल ती निश्चीत करेल. आपसी सहमतीने निश्चीत केलेल्या किंमतीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही. मार्केटमधील चढ उतारामध्ये जर चालु किंमत ही आपसी सहमतीने निश्चीत केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असेल तर अशावेळी मार्केट मधील चालु किंमत आणि आपसी सहमतीने निश्चीत केलेली किंमत याची टक्केवारी काढून ती रक्कम आपसी सहमतीने ठरलेल्या किंमतीमध्ये समाविष्ठ करण्यांत येईल.

8. **भरणा करावयाच्या अटी** –

8.1. मालाची पोचवणी मिळाल्या बरोबर, कंपनी तात्काळ रक्कम अदा करेल. शेतक-यास असाधारण विक्रेता रजिस्ट्रेशन मिळण्यासाठी विक्रेता रजिस्ट्रेशन पूर्ण करण्यांत यावे. शेतक-याने आपला आधार क्रमांक, बँक खाते क्रमांकांचे संपूर्ण विवरण (रोख रक्कम अदा करण्यांत येणार नाही), आयएफएससी कोड करिता रद्द केलेला चेक ज्यामध्ये आरटीजीएस द्वारे रक्कम भरणा करण्यांत येईल.

9. **गोपनीयता आणि विना स्पर्धा** -

9.1. याद्वारे शेतकरी कबुल आणि मान्य करीत आहे की, प्रकल्प राबविणे, त्याची अंमलबजावणी करणे करिता आणि त्याविषयीची आवश्यक ती संपूर्ण

माहिती पुरविण्यासाठी कंपनी बरीचसी रक्कम खर्च करीत आहे. म्हणून अशा प्रकल्पाची कोणतीही आणि संपूर्ण माहिती बाबत गोपनीयता राखणे आवश्यक आहे. केळाच्या विकासाकरिता, कापणीपूर्व आणि कापणीनंतरचे तंत्रज्ञान आणि प्रक्रियेबाबतची आणि व्यवहारीकदृष्टया दोन्ही पक्षांनी मान्य केलेली संपूर्ण माहिती आणि तंत्रज्ञान याविषयी गोपनीयता पाळणे आवश्यक आहे. या कराराच्या अटी व शर्ती नुसार प्रकल्पाच्या संपादणूकीची उपरोक्त नमूद केलेली कोणतीही माहिती शेतकरी उघड करणार नाहीत.

९.२. या करारनाम्याच्या काळात, शेतक-याने कोणत्याही परिस्थितीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या कंपनीसोबत जगाच्या कोणत्याही भागात स्पर्धा करणार नाही आणि शेतकरी कोणत्याही तृतीय पक्षासोबत विकास, प्रक्रिया आणि केळांची भारतात आणि/विदेशात विक्री करिता सहकार्य करेल. करारनाम्याच्या अटी नुसार शेतकरी काही वेळ स्वतः किंवा दुस-या कोणत्याही पक्षाद्वारे कंपनीच्या स्वामित्वविषयक बाबीं करारनाम्यांतर्गत जगात कोणत्याही ठिकाणी केळांची विक्री आणि/किंवा विकास विषयक बाबी उघड करणार नाही.

९.३. या करारनाम्याच्या काळात, शेतकरी कोणत्याही परिस्थितीती प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, कोणत्याही केळांची विक्री, करार झाालेल्या कंपनी शिवाय कोणत्याही पक्षास, करारातील यासंबंधिच्या अटी या उपयोगाकरिता मान्य केल्या आहेत त्या कंपनीची लेखी संमती घेतल्याशिवाय करु शकणार नाही. ठराविक प्रमाणाशिवाय कंपनीने जी केळी विकत घेतलेली नाहीत त्याबाबत शेतक-यास कंपनीची लेखी संमती घेण्याची आवश्यकता नाही.

10. **शेतक-यांच्या हक्कांचे संरक्षण –**

10.1. या करारामुळे शेतक-याच्या शेतीच्या मालकी हक्कावर किंवा ताब्यावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही.

10.2. कंपनीने शेतक-याच्या जमिनीवर जर काही बांधकाम केले असल्यास, करारनाम्याचा कालावधी पूर्ण झााल्यानंतर कंपनीने स्वखर्चाने ते तात्काळ काढून टाकावे.

10.3. उत्पादनाच्या पोचवणी करिता किंवा मालाची पोचवणी कंपनीस झाली नसल्यास, दैवी आपत्तीमुळे पिकाचे झाालेल्या नुकसानीस शेतकरी जबाबदार राहणार नाही.

11. **विवाद सोडविण्याचे कार्यतंत्र –**

11.1. या करारा संदर्भात कोणताही विवाद, वाद, किंवा मतभेद झााल्यास पक्ष हा विवाद समेटाद्वारे सोडविण्याकरिता प्रयत्नांची शिकस्त करतील, आपसी सहमतीने विवाद सोडविण्यास असमर्थ ठरल्यास / तीस दिवसांचे आंत समेट न झााल्यास, नंतर विवाद, वाद किंवा उदभवलेली कोंडी सोडविण्याकरिता **शेतकरी (सबलीकरण व संरक्षण) किंमती विषयक आश्वासन व शेती सेवा किंमत आश्वासन आणि शेत सेवा** अधिनियम, 2020 (**अधिसूचना** 11/2020) **आणि शेतकरी करार किंमत आणि शेती सेवा (विवाद सोडविणे), अधिनियम**, 2020 **अंतर्गत निर्धारीत केलेले** सक्षम अधिकारी अंतीमरित्या सोडवितील.

12. **संकीर्ण** -

12.1. शेतकरी हा स्वतंत्र पक्ष आहे आणि हा करार, संघटना, भागिदारी किंवा संयुक्त साहस, प्रधान आणि एजंट किंवा मालक आणि कामगार, कंपनी आणि शेतकरी यांच्यामध्ये असे नाते निर्माण करण्याबाबत अन्वयार्थ लावू शकत नाही.

12.2. दोन्ही पक्षांनी स्वाक्षरी केल्याशिवाय या करारामध्ये सुधारणा, दुरुस्ती किंवा बदल करता येणार नाही.

12.3. हा करार त्याच्या परिशिष्टासह, पक्षांमध्ये झाालेल्या संपूर्ण कराराची पुढील मांडणी ही व्यवस्था आणि प्रतिज्ञापत्र, तोंडी किंवा लेखी, विषयांकीत बाबीकरिता पूर्वीचे सर्व करार अधिक्रमीत करीत आहे.

12.4. कोणताही एक पक्ष हा करार अभिहस्तांकित किंवा भारग्रस्त करणे किंवा उपकार किंवा हक्क दुस-या पक्षाच्या लेखी संमती शिवाय करु शकणार नाही.

12.5. हा करार दोन प्रतिरुप पक्षांमध्ये, त्यापैकी प्रत्येक जण हा मुळ परंतु हे सर्व एकच दस्तऐवज तयार होईल.

12.6. या करारामधील वापरण्यांत आलेले मथळे हे केवळ सोईकरिता असून ते करार तयार करण्याकरिता किंवा कराराची अर्थउकल करण्यासाठी नाहीत.

12.7. या कराराच्या कोणत्याही अटी बंधनकारक आणि निर्ढावलेल्या पक्षास आणि त्याच्या संबंधीत वारसदारास लागु होणार नाहीत. दुस-या पक्षाच्या लेखी संमती शिवाय कोणताही पक्ष (**यातील उपकारातून मोकळे केल्याशिवाय**) **कोणत्याही तीस-या पक्षास जो त्यांचे सर्व व्यवहार किंवा मत्ता बाबत उत्तराधिकारी म्हणून निर्धारीत करण्यांत आलेला आहे त्यांच्याकडे अभिहस्तांकीत** करु शकणार नाही.

12.8. जर या कराराची कोणतीही तरतूद विधीअग्राहय, बेकायदेशीर किंवा अंमलात न आणण्याजोगी असेल तर मर्यादित आणि व्यवहार्य करण्यासाठी त्यामध्ये सुधारणा करुन ती तरतूद विधीग्राहय, कायदेशीर,प्रवर्तणीय आणि व्यवहार्य करुन ज्याद्वारे उर्वरीत कोणतीही तरतूद परिणामकारक राहणार नाही त्यामुळे कोणतीही हानी पोहोचणार नाही.

12.9. कोणतीही दुरुस्ती लेखी स्वरुपात आणि दोन्ही पक्षांनी स्वाक्षरी केलेली असल्याशिवाय ती विधीग्राह समजल्या जाणार नाही. हक्कविसर्जना बाबत लेखी आणि दोन्ही हक्क विसर्जन करणा-या पक्षांनी स्वाक्षरी केली असल्याशिवाय अशी, या करारातील कोणतीही तरतूद हक्कविसर्जीत

गृहीत धरल्या जाणार नाही. कोणत्याही एका पक्षाने करारातील हक्कविसर्जनाचा भंग केल्यास तो या कारारातील तरतुदिंचा भंग समजल्या जाईल आणि तो अशा कोणत्याही प्रसंगी ग्राहय धरल्या जाईल.

12.10. दोन्ही पक्षांना नोटीस लिखीत स्वरुपात पोच पावतीसह रजिस्टर पोस्टाने पाठविणे आवश्यक राहील किंवा वैयक्तीकरित्या खालील पत्यावर पोहोचविणे आवश्यक राहील (**दुस-या पक्षाला लेखी कळविल्यास**).

**कंपनी :**

-----------------------------

-----------------------------

-----------------------------

**शेतकरी :**

-----------------------------

-----------------------------

-----------------------------

12.11. या करारामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या करारातील कोणतीही किंवा सर्व तरतूदी **शेतकरी (सबलीकरण व संरक्षण) किंमती विषयक आश्वासन व शेती सेवा किंमत आश्वासन आणि शेत सेवा** अधिनियम, 2020

(**अधिसूचना** 11/2020) **या कायद्यातील तरतुदींशी विसंगत असल्यास त्या बेकायदेशीर समजल्या जातील आणि कराराच्या विसर्जनामुळे काही आर्थिक भार पडल्यास त्यास कंपनी जबाबदार राहील आणि तो कंपनीस सोसावा लागेल**.

या ठिकाणी करार करणारे दोन्ही पक्ष साक्षिदारांसमक्ष त्यांचे हात या करारामध्ये गुंतलेले आहेत आणि ते प्रतिरुप असून ते उपरोक्त दिवस, वर्ष नमूद करुन लिहीत आहेत.

स्वाक्षरी आणि पोहोचवणी

**शेतकरी** -

यांच्या समक्ष स्वाक्षरी आणि पोचवणी

**कंपनी**

प्राधिकृत स्वाक्षरीधारक

यांच्या समक्ष

## परिशिष्टांची यादि

| | |
|---|---|
| **परिशिष्ट 'अ'** | : कापणी वेळीच्या घडाची निवड आणि श्रेणी बाबत मार्गदर्शक सूचना |
| **परिशिष्ट 'ब'** | : वजन आणि अधिदान बाबत मार्गदर्शक सूचना |
| **परिशिष्ट 'क'** | : केळीच्या क्षेत्राचे मुल्यांकनाचे कार्याचा आदर्श नमूना. |
| **परिशिष्ट 'ड'** | : केळ या फळाच्या गुणवत्तेचे मापदंड . |

**परिशिष्ट 'अ' : कापणी वेळीच्या घडाची निवड आणि श्रेणी बाबत मार्गदर्शक सूचना**

1. **स्वीकार्य घड/गुच्छ** :
   - **आपसी सहमतीने निश्चीत केलेले मापदंड निश्चीत करणे**.
2. **अंशत: स्वीकार्य घड** :
   - **आपसी सहमतीने निश्चीत केलेले मापदंड निश्चीत करणे**.
3. **नाकारलेले घड** :
   - **आपसी सहमतीने निश्चीत केलेले मापदंड निश्चीत करणे**.

**परिशिष्ट 'ब' : वजन आणि अधिदान बाबत मार्गदर्शक सूचना**

अ. **वजन** :

-

1. **स्वीकार्य घडांची कापणी आणि तळाचे डि-हॅन्डिंग करणे. केवळ निवडक हॅंड खोक्यामध्ये / क्रेटस आणि वजन केलेले.**

2. **शेतक-या सोबत कापनी पर्यवेक्षक किंवा त्याचे/तिचे प्रतिनिधी यांनी तत्सम वजनाची नोंद घ्यावी.**

3. **बॉक्स भरलेले वाहन/ क्रेटस़ चे वजन शेतक-याने वजन काटयावर स्वखर्चाने करावे आणि केळाचे एकूण वजनामधून बांधणीच्या वस्तुंचे म्हणजेच बॉक्स/ क्रेट यांचे वजन वजा करुन परिगणना करावी.**

**ब. प्रदानाकरिता आधार –**

| **देयकातील बाब** | **परिगणना केलेली रक्कम** |
|---|---|
| चांगल्या गुणवत्तेची प्राप्त केळी | मुळ मूल्य (**बी**-1) **:** एकूण वजन किलोमध्ये (**ए + बी + सी**) आपसी समहमीने निश्चीत केलेले मार्केटचे दर - रुपये/किलो**.**<br>मार्केटचे दर निर्धारीत कातांना आपसी संमतीने ठरविलेली कापनीचा दर म्हणजेच संपूर्ण कापनी केलेल्या केळांची किंमत रुपये प्रति/किलो त्यांच्या आकारानुसार (**ए + बी + सी**) |

**परिशिष्ट ‘क’ - केळीच्या क्षेत्राचे मुल्यांकनाचे कार्याचा आदर्श नमूना**.

अ. **मासिक मुल्यांकन आणि अहवाल**.

- परस्पर मुल्यांकन पध्दत निश्चीत करणे.

ब. **पट्टी आकारणीची पध्दत**

- परस्पर मुल्यांकन पध्दत निश्चीत करणे.

परिशिष्ट ‘ड’ **: केळ या फळाच्या गुणवत्तेचे मापदंड**.

1. **उणीवा आणि वर्ग ‘अ’ करिता ग्राहय मर्यादा**.
   - परस्पर उणीवांचा तपशिल आणि त्यांच्या ग्राहय मर्यादा निश्चीत करणे.
2. **उणीवा आणि वर्ग ‘ब’ करिता ग्राहय मर्यादा**.
   - परस्पर उणींवाचा तपशिल आणि त्यांच्या ग्राहय मर्यादा निश्चीत करणे.
3. **शून्य सहिष्णुतेतील उणीवा.**
   - परस्पर उणीवांचा तपशिल आणि त्यांच्या ग्राहय मर्यादा निश्चीत करणे.

4. **फळांचे वय, व्यास, लांबी, हातात असलेली फळांची संख्या, आणि कापणीच्या वेळी असलेली कार्यात्मक पाने**.

5.

| | |
|---|---|
| फळाचे वय – आठवडे | ऋतु आधारीत आणि तोडणी करिता गुणवत्ता मुल्यनिर्धारण विभाग – 8 ते 16 आठवडे |
| कापनीच्या वेळेची पाने | कमितकमी 5 कार्यात्मक पाने |
| कॅलीब्रेशन | 44-46 कॅलीपर –हाताचे मधले बोट |
| बोटांची लांबी – इंच | पल्पची लांबी कमितकमी 7 से.मी. |
| बोटांची संख्या/ हात | कमितकमी 12 |